प्रकरण तिसरे

# उघडझापमधील : व्यक्तिरेखाटनांचा अभ्यास

पान क्र. ५९ ते ८८

# प्रकरण तिसरे

# 'उघडझाप' मधील व्यक्तिरेखांचा अभ्यास

३.१ प्रास्ताविक

३.२ 'उघडझाप' या आत्मपर आठवणी संग्रहातील व्यक्तिरेखा

१) बालसवंगडी
२) श्रमजिवींचे व्यक्तिचित्र
३) प्रिन्सिपल स्ट्रेलर
४) बंडोपंत मास्तर
५) आठवणीतील आजी
६) बाळाबाई
७) दादा
८) गुंडोपंत
९) आत्ती
१०) मोठे मामा-गणपतराव आरवाडे
११) धाकटे मामा-रामभाऊ आरवाडे
१२) पन्नास वर्षापूर्वीचे गुरूजन-विद्यार्थी
१३) सुहृध्द पत्नी
१४) स्वच्छंदी मनाचा मित्र
१५) इंग्लंडमध्ये भेटलेले महाराष्ट्रीय चित्रकार
१६) कौटुंबिक जिव्हाळ्याची नाती
१७) जी.ए. नावाचं कोडं

३.३ निष्कर्ष

# प्रकरण – तिसरे

# उघडझापमधील : व्यक्तिरेखाटनांचा अभ्यास

## ३.१ प्रस्तावना :

मराठी साहित्यव्यवहारातील महत्त्वाच्या घडामोडींवर अत्यंत दक्षतेने नजर ठेवून असणारे सुजान समतोल विचाराचे समीक्षक म्हणून म. द. हातकणंगलेकर यांचा लौकिक आहे. सर्जनशील समीक्षक म्हणून ज्या तटस्थ वृत्तीने ते जगले त्याच तटस्थ वृत्तीने 'उघडझाप' मधून आपणासमोर उभे राहिल्याचे दिसून येते. एक सर्जनशील समीक्षक आणि माणूस म्हणून जीवन जगत असताना जे सुख–दु:खाचे प्रसंग त्यांच्या वाट्याला आले, ते एका समीक्षकाच्या दृष्टिने प्रामाणिकपणे 'उघडझाप' मध्ये मांडलेले आहेत. आपल्या या आत्मकथनपर निवेदनामध्ये आपणास लाभलेल्या प्रदीर्घ अशा ७५ वर्षांच्या आयुष्यामध्ये ज्या–ज्या व्यक्तिंचा सहवास त्यांना लाभलेला आहे, त्यापैकी काही ठळक अशा व्यक्ती म. द. हातकणंगलेकरांनी 'उघडझाप' या आठवणी संग्रहाच्या माध्यमातून तटस्थपणे आपणासमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. या व्यक्तिमध्ये आप्त, स्नेही, मित्र, गुरूजन, साहित्यिक इत्यादींची उपस्थिती आहे.

या सर्व चित्रणात त्यांनी आयुष्याच्या कलत्या सांजवेळी आपल्या जीवनाचाही प्रवास मांडलेला दिसून येतो. त्यांनी ही व्यक्तिचित्रणे स्फुट लेखाच्या स्वरूपात १९९५ पासून लिहिलेली आहेत. हे स्फुट लेख वेगवेगळ्या अंकातून प्रसिद्ध झालेले आहेत. आपल्या जीवनातील नेमक्या घटना, प्रसंग आणि व्यक्ती निवडून त्यामधून आपल्या जीवनाचा चित्रपट म. द. हातकणंगलेकरांनी वाचकांसमोर उभा केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या वाङ्मयीन जाणिवा विकसित होवून प्रगल्भ परिणत रसिक, अभ्यासक, कलावंत व एक समीक्षक व्यक्तिमत्त्व कसे बनले त्याचाही आलेख 'उघडझाप' या आठवणींच्या संग्रहातून स्वाभाविकपणे चित्रित होतो.

म. द. हातकमणंगलेकरांचा जन्म हातकणंगले या तालुक्याच्या, पेठ्यांचे ठिकाण असणाऱ्या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील कोल्हापूरला कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या परवानगीने 'सनदी' म्हणून काम पाहत होते. ते एक उत्तम शेतकरीही होते. त्यांची स्वत:ची व

दुसऱ्याकडून कसण्यासाठी घेतलेली शेतमळ्यांची शेती होती. त्यामुळे त्या शेतमळ्यांशी म. द. हातकणंगलेकरांचा प्रत्यक्ष संबंध आलेला दिसतो. त्यामुळे आपले गाव, आपली शेती, ग्रामीण माणूस तेथील संस्कृतीचा जिव्हाळा त्यांच्या जीवनाशी एकवटलेला दिसून येतो. याबरोबरच घरच्या माणसांची उबदार मायाही त्यांनी अनुभवलेली आहे. घरच्या भाजी-भाकरीची अनोखी चव आजही त्यांना आठवते. त्यांच्या मळ्यात चालणाऱ्या गुऱ्हाळाचे तपशिलवार चित्रण त्यांनी आपल्या 'उघडझाप' ग्रंथामधून केलेले आहे. गावाकडे राहात असताना त्यानंतर सांगलीला राहायला आल्यानंतर घडलेल्या अनेक घटना, भेटलेल्या व्यक्ती, प्रसंग या सर्व गोष्टी अत्यंत सहज व ओघवत्या शैलीमध्ये त्यांनी 'उघडझाप' या ग्रंथामधून मांडलेली आहेत. या आपल्या आत्मकथनपर निवेदनामध्ये व्यक्तिरेखाटनाला त्यांनी विशेष महत्त्व दिलेले दिसते. त्यांच्या कौटुंबिक जिव्हाळ्याच्या व्यक्तिंची शब्दचित्रे त्यांनी 'उघडझाप' म्हणून रेखीवपणे उभी केलेली दिसून येतात.

प्रस्तुत 'उघडझाप' या आत्मपर आठवणी संग्रहामध्ये म.द. हातकणंगलेकरांची जीवितकथा आपल्या प्रत्ययाला येते ती प्रामुख्याने त्यांनी वर्णिलेल्या व्यक्तिंच्या अनुरोधाने, त्या व्यक्तिबाबत घडलेल्या काही प्रसंगांच्या आधाराने अशा विविध व्यक्ती व त्यांचे व्यक्तीदर्शन, त्यांची प्रवृत्ती यांचा अभ्यास पुढील भागात मांडला आहे.

## ३.२ 'उघडझाप' या आत्मपर आठवणी संग्रहातील व्यक्तिरेखा

### १) 'बालसवंगडी'

या व्यक्तिरेखांमध्ये म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या भूतकाळामध्ये घडलेले मात्र मनामध्ये घरकरून राहिलेल्या बालपणीच्या व्यक्तिरेखा या लेखामध्ये दिलेल्या आहेत. सुमारे पंचावन्न ते साठ वर्षामधील रम्य असे बालपण, जे आज हरवले आहे त्या हरवलेल्या बालपणास म.द. हातकणंगलेकर या व्यक्तिरेखेतून उजाळा देतात. म.द. हातकणंगलेकरांना क्रिकेटचे भारी वेड होते. आपणासही उत्तम क्रिकेट खेळता यावे यासाठी त्यांनी एक टीमही तयार करण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठी त्यांनी गावातलेच कुलकर्णी, शि.आ. स्वामी, शंकर मोरे, सय्यद पठाण, श्यामू सावंत या त्याकाळी फॉर्ममध्ये असणाऱ्या खेळाडूंच्या सहवासात ते सतत राहात असत. हे त्यांचे क्रिकेटचे वेड सात-आठ वर्षे कसे टिकलेले होते असे ते सांगतात. त्यामुळे 'क्रिकेट म्हटले की, माळावरची गवताची पिवळी पाती मला आठवतात'[१] असे ते म्हणतात.

याच बालपणातील आठवणी पानाला पान जोडून आठवायचे म्हटले, तर हिवाळ्यातल्या सकाळच्या वेळा त्यांना आजही आठवतात पहाटेच्या वेळी रस्त्याच्या कडेला शेकोटी पेटवली जायची, शेकोटी सतत तेवत ठेवण्यासाठी पाचोळा लागायचा त्याला 'सासू' म्हणण्याचा प्रघात होता. ''सासूला जाळण्याची मुलांच्या मनामध्ये इच्छा का उद्‌भवली याचा समाजशास्त्रीय शोध घेतला पाहिजे.''[२] असे ते सांगतात. याच 'सासूला जाळण्यासाठी आमच्या शेजारी राहात असलेली, भुरे केस असणारी, परकर पोलके घालणारी 'जनी' ही यायची, ती म.द. हातकणंगलेकरांना मुलुखावेगळी वाटायची, त्यांना ती फार आवडायची. 'जनी मंदपणे हसत असायची. दिवसभर ती रानात जनावरे राखायला जाई. काही दिवसांनी ती तापाने आजारी पडली. त्यातच ती झटकाफटकी गेली. यावर म.द. हातकणंगलेकरांचा कित्येक दिवस विश्वास बसलेला नव्हता. पुढे ते खानोलकरांची 'चानी' वाचत असताना 'जनी'ची आठवण झाली होती. ''चानी' मोठी 'जना' लहान.''[३] असे ते म्हणत.

## २) 'श्रमजिवींचे व्यक्तिचित्र'

या व्यक्तिचित्रणामध्ये शेतामध्ये गुळ तयार करण्यासाठी काबाडकष्ट करणाऱ्या व्यक्तिंची व्यक्तिमत्वे लेखक नमूद करतात. या व्यक्तिंची व गुळव्याची आठवण आजही लेखकास झाली, की त्या आठवणीचा गंध नाकपुड्यांतून घमघमत मस्तकात चढतो. याच गुऱ्हाळाचे वर्णन लेखक चित्रमयपणे आपणासमोर उभे करतात. यातील व्यक्तिरेखांच्या माध्यमातून गुळ तयार करण्याची पद्धत, त्यासाठी लागणारे कामगार या घटनांचा लेखकांना प्रत्यक्ष आलेला अनुभव आजही त्यांच्या डोळ्यासमोर जशाचा तसा उभा राहतो. चुलवानासमोर धगधगत्या निखाऱ्याबरोबर होरपळून जाणाऱ्या व्यक्तिंचे जीवन लेखकाला आज अस्वस्थ करते. मात्र बालपणी हे दृश्य त्यांच्या मनाला आनंद देणारे होते. म्हणून रम्य असे बालपण जे त्यांनी जगले होते त्याविषयी त्यांच्या मनामध्ये 'ते श्रेय आता हरपले ते हरपलेच' असा भाव निर्माण होतो.

## ३) 'प्रिन्सिपल स्ट्रेलर'

मनामध्ये आठवणी उन्मळू लागल्या की भूतकाळाचे अंतर विरघळून जाते आणि त्या सुखाची चव पुन्हा तितक्याच जिव्हाळ्याने अंतर्यामी पाझरू लागते. या व्यक्तिचित्रणामध्ये अशा प्रकारचा अनुभव म. द. हातकणंगलेकरांनी वर्णन केलेला आहे. म.द. हातकणंगलेकर इंग्रजी

दुसरी, तिसरीत असताना योगायोगाने एका मिशनरी मंडळींनी चालवलेल्या शाळेत दाखल झाले. त्या वेळच्या आठवणींचे हे मोहळ आहे. वडिलभावाचे शिक्षण फारसे झालेले नसले तरी त्याला वाचनाची फार आवड होती. वडिलभावाच्या कपाटात इंग्रजी मासिके आणि ब्रिटिश इतिहासाची सचित्र पुस्तके भरपूर होती. ती पुस्तके म.द. हातकणंगलेकर वाचत. यातुनच इंग्रजीबद्दल एक छुपे आकर्षण त्यांच्या मनामध्ये निर्माण झाले. आपणाला शिकता नाही आले, पण आपल्या लहान भावाने शेजारच्या शहरात असलेल्या मिशनरी शाळेत शिकावे अशी त्यांची इच्छा होती. लहानपणी चिमणी सारखे जगलेले रमणीय प्रसंग ते रेखाटतात. शाळेला सुट्टी असते तेव्हा पारंब्याचा चालत असलेला खेळ मोठ्या तन्मयतेने ते सांगतात. याबरोबर शिक्षकांना कमी पगारामुळे सहन करावा लागणारा त्रास त्यांच्या बालमनाला कसा चटका लावून जातो. याचेही चित्रण त्यांनी यामध्ये विदारकपणे केलेले दिसते. मिशनरी शाळेतील प्रिन्सिपाल, स्टेलर त्यांचे मुलांच्या बद्दल असणारे प्रेमळ नाते, सुट्टीच्यावेळी मुलांना आपल्या घरी जेवणासाठी घेऊन जाणे किंवा कविता वाचून दाखवणे. यातून लहानपणीच्या छोट्या मोठ्या गोष्टीचा त्यांच्या मनावरती, जो परिणाम झाला त्यातून म. द. हातकणंगलेकरांची जी एक विचारांची मूर्ती निर्माण झालेली आहे. ती आजही आपणास पाहता येते.

### ४) **'बंडोपंत मास्तर'**

याच हरपलेल्या श्रेयामध्ये एक लोभस व्यक्तिरेखा लपलेली आहे. ती आहे एका शिक्षकाची. 'बंडोपंत मास्तर' हे त्यांचे नाव. आडनाव कुलकर्णी. लेखकांच्या शाळेत ते शिक्षक म्हणून नव्हते. तरीही त्यांच्याविषयी म. द. हातकणंगलेकरांना आदर आणि जिव्हाळा वाटत असे. त्यांची मूर्ती ठेंगणी, शरीर सुदृढ, डोक्यावर दाट काळेभोर मागे फिरवलेले पण वारंवार पुढे येणारे केस, घोट्याच्या वर येणारे, समोर पट्टीदार निऱ्या सोडलेले धोतर, पांढरा हाप शर्ट, सतत पान खाणारे अशी मास्तरांची मूर्ती आजही म. द. हातकणंगलेकरांना आठवते. ते गावातील, गावाबाहेरील विस-तीस मुलांची शिकवणी घेत असत. याबरोबर ते उत्तम चित्रेही काढत असत. मास्तर अभ्यासातून विरंगुळा म्हणून मुलांशी गोट्या, विटीदांडू खेळत, मुलांना ओढ्यावर आंघोळीसाठी घेऊन जात, कधी-कधी झुंझुरक्या चांदण्या रात्री आपल्या अंगणात जेवणाचा बेत ठेवत. या शिक्षकांचे मुलांवरती भारी प्रेम होते. म. द.

हातकणंगलेकरांनी या शिक्षकांच्या कपाटातील एकदा त्यांच्या अपरोक्ष 'नाना देशचे नाना लोक' हे पुस्तक न सांगता वाचायला नेले होते. ही गोष्ट शिक्षकांना समजल्यानंतर त्यांनी लेखकांना न रागवता मायेने समजावले होते. शिक्षकांनी लेखकाला सांगितले होते की, तुला जे आवडेल ते मला सांगून नेत जा, असे हे प्रेमाने मुलांशी वागणारे 'बंडोपंत मास्तर'.

५) **'आठवणींतील आजी'**

या व्यक्तिरेखेमध्ये लेखक म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या आजीचे म्हणजे वडिलांच्या आईचे व्यक्तिचित्र रेखाटलेले आहे. म. द. हातकणंगलेकरांना ज्या व्यक्तिंनी संस्कारांचा अनमोल असा ठेवा दिलेला आहे, त्यापैकी ही एक व्यक्तिरेखा. या आजीच्या व्यक्तिरेखेने त्यांच्या मनावर खोलवर परिणाम केलेला आहे.

म.द. हातकणंगलेकरांच्या बाल, कोमल मनावर संस्कार करणारी स्त्री म्हणजे त्यांच्या वडिलांची आई. आपल्या आजीचे व्यक्तिमत्त्व त्यांना अतिशय लोभस वाटते. तिच्या हातचा स्वयंपाक त्यांना विशेष आवडत असे. बालपनामध्ये आजीने त्यांना वेताळपंचविशी, सिंहासन बत्तीशी, इसापनिती, पंचतंत्र, अरबी सुरसकथा अशा कितीतरी गोष्टी सांगितल्या होत्या. त्या गोष्टीचा मोठा परिणाम लेखकांच्या बालमनावर झालेला आहे. 'या कथांमुळे माझे बालपण सुखात गेले आणि साहित्याचे प्रेम माझ्या मनात रूजले.'[४] असे त्यांनी प्रांजळपणे नमुद केलेले आहे. त्यामुळे साहित्याबद्दलची विलक्षण आवड लहानपणीच त्यांच्या मनात निर्माण झालेली आहे. घरामध्ये राहायला तिला एक स्वतंत्र खोली होती. ती किंचित अंधारी होती. त्या खोलीमध्ये ती एकटीच दिवसभर काहीतरी करीत असे. तिथे तिचे काय चालत असे याचे एक गूढच होते. तिला उपजत औषधांचे ज्ञान होते. नेहमीच्या लहान मुलांच्या आजारपणासाठी तिच्याकडे गुणकारी औषधे असत. या आजीच्या औषधांमुळे गरीब माणसे, बाया बापड्या, पोरेटोरे कशी जगतात याबद्दलची माहिती व कणव म.द. हातकणंगलेकरांच्या मनात साचून राहिलेली आहे. वडिलांचा अकाली घातपाताने मृत्यू झाला. त्यानंतर सर्वांनी गाव सोडले व सांगलीला आले. पण आजी खेड्यातल्या घरात होतो. तिथेच तिचा अंत आला. 'जेव्हा जेव्हा अनादी स्त्रीतत्त्वाबद्दल बोलणे होते तेव्हा तेव्हा म.द. हातकणंगलेकरांना आजी आठवते.'

६) **'बाळाबाई'**

बाळाबाई नावाची दुसरी एक वृद्ध स्त्री लेखकाच्या शेजारी राहत होती. ती ज्या घरात राहात होती ते घर रखमाबाई या मराठा विधवा स्त्रीचे होते. दोन खोल्यांतच तिचा संसार होता. बाळाबाई पांढरे पातळ नेसत असे. ती नेहमी निटनेटकी राहात होती. ब्राह्मणी वळणाची त्यांची स्वच्छ वाणी होती. तिच्याकडे गोष्टींची उत्तम पुस्तके होती. ती मुलांना गोष्टी सांगत असे. गोष्टी ऐकता ऐकता बराच वेळ होत असे तेव्हा कधी कधी लेखक तिच्याबरोबर तिच्याच घरी भाजी-भाकरी खात असे. पुढे बाळाबाई वृद्धापकाळाने गेली तेव्हा 'आमच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने पोकळी निर्माण झाली असे म. द. हातकणंगलेकर म्हणतात'. त्याचे कारण बाळाबाईची मूर्ती डोळ्यासमोर आल्यावर लेखकाला आपल्या आजीची आठवण होत असे. तिच्या चेहऱ्यामध्ये लेखकांना आपल्या आजीचा चेहरा दिसत असे इतके दिसण्यातले, वागण्यातले साम्य त्या दोघीमध्ये होते.

या दोन स्त्री व्यक्तिरेखेबरोबर आणखी एक वृद्धा लेखकांना आठवते. तिला वृद्धा म्हणणे फार कठीण आहे असे ते सांगतात. कारण तीचे वागणे बोलणे बेदरकार, कणखर, गड्यासारखे असे. ती शेतात गड्याप्रमाणे काम करी. शेतकामापेक्षा मोट चालवणे तिला जास्त आवडत असे. अन्य स्त्रियांच्या तुलनेत ती मुलुखावेगळी वाटत असे. तिच्यासंबंधीची आणखी एक गोष्ट लेखकांना आठवते. तिच्या वरच्या ओठाच्या कडेला आणि हनुवटीवर केस होते. ते पाहाण्यात एक चमत्कारीक कुतूहल लेखकांना वाटत असे.

७) **'दादा'**

म.द. हातकणंगलेकर आपल्या वडिलांना 'दादा' या नावाने संबोधित होते. आपल्या वडिलांचे म्हणजे दादांचे व्यक्तिचित्र लेखकांनी वाचकासमोर उभे केलेले आहे. व्यक्तिगत प्रपंचामध्ये, व्यवसायामध्ये, सार्वजनिक जीवनामध्ये प्रत्येकाला दु:ख, निराशा, त्रास, वेदना या गोष्टी कोणाला चुकलेल्या नाहीत प्रत्येकांना अशा प्रसंगाना सामोरे जावे लागते. म.द. हातकणंगलेकरांचे आयुष्यही त्याला अपवाद नाही. अशा दु:खांची जी साखळी त्यांच्या जीवनामध्ये वेळोवेळी आली आहे, त्याचे चित्रण 'मरणसाखळी' या आठवणीमध्ये ते करतात. यामध्ये आपले 'वडील' व 'मोठा भाऊ' यांच्या मृत्यूमुळे म.द. हातकणंगलेकरांचे दु:खी, भणंग झालेले

उदासवाणे मन आपल्या प्रत्ययास येत राहते.

म. द. हातकणंगलेकरांचे वडील शाहू महाराजांच्या दरबारात 'सनदी' म्हणून काम पाहात होते. त्यांचे शिक्षण फारसे झालेले नव्हते मात्र त्यांची 'हुशारी' पाहून शाहू महाराजांनी त्यांना 'सनद' ही पदवी दिलेली होती. या मिळालेल्या सनदीचा वापर त्यांनी स्वतःच्या जीवनासाठी, कुटुंबासाठी न करता गोरगरीबांसाठी श्रमजीवी लोकांसाठी केला होता. या त्यांच्या वागण्यामुळे परोपकारी वृत्तीमुळे त्यांनी नावलौकिक मिळविला होता. आपल्या या व्यवसायाबरोबरच, शेतीचीही त्यांना फार आवड होती. ते आपल्या शेतात नेहमी नवनवीन प्रयोग करीत असत. त्यांच्या या प्रयोगामुळे एक 'प्रगतीशील शेतकरी' म्हणून त्यांची ख्याती होती, लौकिक होता. आपला मळा पिकवत पिकवतच दुसऱ्याचाही मळा व्याजाने कसण्यासाठी ते घेत असत. असाच एक मळा 'मल्ल्या' या नावाच्या गृहस्थाचा लेखकाच्या वडिलांनी घेतला होता. या मल्ल्याला वारंवार पैशाची गरज भासत होती. म.द. हातकणंगलेकरांच्या वडिलांनी त्याला काही पैसे त्याच्या शेतमळ्यावरती व्याजाने दिलेले होते. मात्र मळ्याचा मालक मल्ल्याची आणखी जादा पैशाची मागणी होती. मल्ल्याची पैशाची मागणी दिवसेंदिवस वाढत चाललेली होती. वडिलांच्या कौटुंबिक व आर्थिक अडचणीमुळे त्यांना वेळोवेळी होणारी मल्ल्याची मागणी पूर्ण करता आली नाही. या गोष्टीचा राग मल्ल्याच्या मनात होता. एके रात्री मल्ल्याने अंधाराचा फायदा घेत डाव साधला आणि लेखकांच्या वडिलांचा निर्घृण खून केला. वडिलांच्या खूनामुळे म.द. हातकणंगलेकरांचे कुटुंब उध्वस्त झाले. लेखकांच्या संवेदनशील बालमनावर वडिलांच्या खुनाचा खोलवर परिणाम झाला. अचानक झालेल्या वडिलांच्या खुनामुळे, कुटुंबासमोर उभ्या राहिलेल्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी सांगलीला मामाच्या गावी त्यांच्या आश्रयाला जावे लागले. चांगल्या, प्रेमळ आणि जिवापाड जपणाऱ्या वडिलांच्या मृत्यूने म.द. हातकणंगलेकर हळवे बनले. या दु:खाचे चरे त्यांच्या मनावरती दीर्घकाळ उमटलेले आहेत.

### ४) 'गुंडोपंत'

आपले मोठे भाऊ 'गुंडोपंत' यांचे व्यक्तिचित्रण लेखक रेखाटतात. आपल्या मोठ्या भावाचे जीवन, त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा स्वैर दृष्टिकोन व त्याच्या जीवनाचा शेवट या आठवणींचे चित्रण म. द. हातकणंगलेकरांनी केलेले आहे. लेखकाचे मोठे भाऊ 'गुंडोपंत' हे

कर्तृत्वशून्य होते. आयुष्यामध्ये स्वतंत्रपणे त्यांना काहीच करता आले नाही. त्यांना आयुष्यात पुष्कळवेळा संधी मिळाली. मात्र मिळालेल्या संधीचे सोने त्यांना करता आले नाही. ते छंदीफंदी निघाले. आपल्या आयुष्याकडे त्यांनी मृत्यू शय्येवर पडले असतानाही गांभीर्याने पाहिले नाही. त्यांनी आपल्या पत्नीवर कधी प्रेम केलेच नाही. त्यांची पत्नी मात्र त्यांच्यावर निष्कामपणे जिवापाड प्रेम करीत होती. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणी म्हणजे ते आजारी असताना त्यांच्या पत्नीने त्यांची लहान मुलाप्रमाणे सेवा केलेली होती. त्याचे मात्र कधीच त्यांना काही वाटले नाही. तिचे जगणे एखाद्या 'साध्वी' सारखे होते. व तशीच शेवटपर्यंत ती जगत राहिली. असे भावपूर्ण कथन वहिनीविषयी त्यांनी केले आहे. त्यांना शिक्षणाची आवड होती. मात्र त्यांना शिक्षण घेता आले नाही. तरीही आपल्या लहान भावाने शिकावे अशी त्यांची मनोकामना होती. आपल्या इच्छेची पूर्तता होण्यासाठी त्यांनी लेखकांना इंग्रजी शाळेत नाव घालण्यास घरच्यांना भाग पाडले होते. त्यांच्याजवळ असणाऱ्या इंग्रजी मासिकांची, तसेच कथांची पुस्तके यामुळे लेखकांचा इंग्रजीकडे अधिक कल वाढत गेला. बालवयातच या पुस्तकांच्या सहवासामुळे लेखकांच्या मनामध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्माण झाली. मोठ्या भावाला अनेक साहित्यिक मित्र असल्याने लेखकांना लहानपणीच कथा-कादंबऱ्यांची पुस्तके वाचायला मिळाली. याचा परिणाम म्हणजे लहानपनापासून म. द. हातकणंगलेकरांच्या मनामध्ये साहित्याविषयी आवड निर्माण झाली.

असे असले तरीही लेखकांचे मोठे भाऊ 'गुंडोपंत' आपल्या आयुष्यामध्ये कधीच स्थिर होऊ शकले नाहीत. त्यांच्या या कलंदर जगण्याचा कुटुंबाला अधिक उपद्रवच झाला. त्यांच्या अशा बेदरकार वागण्यामुळे कुटुंबाला बराच त्रास सहन करावा लागला. तरीही लेखकांची आई आपल्या मोठ्या मुलाच्या चुकावरती पांघरूण घालत असे. व त्यांना गुंडोपंत यांना सांभाळून घेण्याविषयी वारंवार सांगत होती. अपत्यप्रेम आंधळे असते. त्यातही आईला 'गुंडोपंत'सारख्याच मुलाची अधिक काळजी असते. हे सत्य इथे आपसूकपणे स्पष्ट होताना दिसते.

### ६.) आत्ती

आत्ती ही म. द. हातकणंगलेकरांच्या वडिलांची बहीण. तिचे नाव 'हिरा' असे होते. तिचा नवरा वारल्यापासून ती भावाच्या म्हणजे म.द. हातकणंगलेकरांच्या वडिलांच्या घरी राहात

होती. लहानपणी म. द. हातकणंगलेकरांच्या आईला पोटाचा विकार जडला त्यामुळे ती सदैव आजारीच असे. त्यामुळे या वयातले म. द. हातकणंगलेकरांचे सर्व पालनपोषण आत्तीनेच केले. तिचा लेखकावरती अतोनात जीव होता. जणू 'मी तिचाच मुलगा आहे असे तिला वाटत असे', असे म. द. हातकणंगलेकर सांगतात. तिचे मागे केव्हातरी लग्न झालेले होते. ताकारी हे तिचे सासर, तिच्या नवऱ्याचे मिठाईचे दुकान होते. त्यांना हलवेकरी म्हणत. इतक्याच तिच्या पूर्वजन्माच्या आठवणी लेखकांना माहित होत्या.

दिवसभर ती मळ्यामध्ये म्हैशींना घेऊन जायची. तिथेच दिवसभर थांबून ती गडीमाणसांवर देखरेख ठेवत असे. असे तिचे कष्टमय जीवन होते. मात्र लेखकांवर तिची अपार माया होती, त्यामुळे ती त्यांचे पोटभरून कोडकौतुक करीत असे. म्हशीच्या दुधामधून जो थोडाफार पैसा ती आपल्या जवळ शिल्लक ठेवत असे तो तिने स्वत:साठी कधीच खर्च केल्याचे लेखकांना आठवत नाही. त्या दुधाच्या साठवलेल्या पैशातून काही पैसे ती लेखकाच्या खाऊला देत असे. तर कधीतरी बाजारातून नवीन कपडे म. द. हातकणंगलेकरांना घेत असे. मात्र स्वत:साठी म्हणून तिने कधीच नवीन कपडे खरेदी केल्याचे लेखकांना आठवत नाही. लेखकांच्या वडिलांचा म्हणजे तिच्या भावाचा ज्यावेळेस मृत्यू झाला त्यावेळेस दु:खावेगाने तिने जो आकांत मांडला तो भयंकर होता. तिच्या आक्रोशात खंड नव्हता. तिचा आक्रोश अखंड होता. तसा आक्रोश 'मी आजवर पुन्हा अनुभवलो नाही' असे लेखक सांगतात. त्या दोघा बहिणभावांमध्ये कितीतरी जिव्हाळा होता.

म. द. हातकणंगलेकरांची आत्या ही त्यांच्या लहानपणापासून म्हणजे वयाच्या पाचव्या, सातव्या वर्षापासून त्यांच्या भावजीवनाचा अतूट असा भाग बनून राहिलेली होती. लेखक सांगतात, की तिच्या आयुष्याला दोनच परिमाणे होती; एक कष्टाचे आणि दुसरे कनवाळू प्रेमाचे. त्या पलीकडच्या परिणामाची तिला गरजही नव्हती. त्यामुळे तिचा स्वभाव संपूर्ण व्यावहारिक वृत्तीचा आणि रांगडेपणाचा झालेला होता. 'तिच्या कष्टाच्या परिमाणात शेतीची कामे, जनावरांची जपणूक, स्वयंपाकपाणी आणि तिच्या वात्सलतेच्या परिमाणात बंधुप्रेम, त्यांच्या मुलांचा वत्सल सांभाळ, त्यांच्या बद्दलचा त्याग आणि त्यांच्यावर घातलेले मायेचे सतत दाट पांघरून, याशिवाय दुसऱ्या भावनेला प्रवेश नव्हता, आणि आवकाशही नव्हता',[५] असे ते

सांगतात. यामुळे आत्तीच्या  मृत्यूनंतरही एक वेळ झोपेमध्ये असताना ती आपल्याशी बोलते आहे असा भास त्यांना झालेला होता. त्यावेळी तिच्या चेहऱ्यावरून प्रचंड माया ओसंडत होती. अशी आत्याची प्रतिमा लेखकांच्या मनामध्ये, मनातील आठवणीमध्ये रूतून बसली आहे.

## १०) मोठे मामा – 'गणपतराव आरवाडे'

म. द. हातकणंगलेकर यांच्या आईंना दोन भाऊ. त्यातले थोरले 'गणपतराव आरवाडे' आणि धाकडे 'रामभाऊ आरवाडे'. मोठे मामा यांचे शिक्षण जेमतेम चौथीपर्यंत झालेले होते. ते मोडी भाषेतच लिहीत आणि मोडीतच सही करत होते. घरची ओढगस्तीची परिस्थिती असल्याने त्यांना आपले शिक्षण मध्येच सोडून द्यावे लागले. त्यामुळे त्यांना आपल्या आयुष्याच्या सुरूवातीचे काही दिवस अडत दुकानात हलकी नोकरी करण्यात घालवले. अशी कामे करीत असतानाच, 'आपला अभ्युदय साधण्यासाठी त्यांनी हरतऱ्हेचे प्रयत्न केलेले होते. ज्या अडत दुकानात त्यांनी हमालासारखे हलके काम केले, अनेक तऱ्हेचे अपमान सहन केले, मालकाच्या अकारण अपशब्दांची शल्ये मनात वागवली, असा आपला झालेला अपमान त्यांनी मनामध्ये साठवलेला होता. तो सतत त्यांच्या मनास बोचत होता, त्याचप्रमाणे त्यांना प्रेरणाही देत होता. असे जीवन जगत असतानाच आपण ही अशा गिरणीचे मालक असावे ही भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेली होती. चिकाटीने तेलाच्या, कापसाच्या गाठी बांधण्याच्या, आणि हळद चोळण्याच्या गिरणीत त्यांनी एक आणा वाटणी मिळवली. ते स्वतःच त्या गिरणीचा दैनंदिन व्यवहार पाहू लागले. यापुढील काळामध्ये त्यांनी मोठ्या कष्टातून भागीदारीतून धंदा करीत प्रामाणिकपणे भागीदारांचा विश्वास संपादन करून मिल आपल्या मालकीची करून घेतली.' [७]

'अशा स्वाभिमानाची धार असणाऱ्या आणि जिद्दीने जीवन जगणाऱ्या थोरल्या मामांचा पोशाख साधा होता. धोतर, शर्ट, त्याच्या आतमध्ये जाड कापडाचे खिसे असलेले दंडके. गळ्यात जाणवे, त्याचा वापर तिजोरीच्या किल्ल्या बांधण्यासाठी करत. केस डोक्याबरोबर कापलेले. मिशा जाड पण भरघोस नव्हेत.'[६] ते इरांशी फार कमी बोलत, मात्र ते नेहमींच स्वतःशी काहीतरी पुटपुट असायचे. अशा बाह्यरूपी स्वभावाचे असलेले लेखकाचे मामा मात्र दूरदृष्टीचे होते. ते नेहमीच दूरच्या फायद्यासाठी गुंतवणूक करीत आलेले होते. ही त्यांची दूरदृष्टी जशी त्यांच्या धंद्यामध्ये होती तशीच त्यांनी ती कुटुंबाच्या व नातेवाईकांच्या बाबतीत ही

जोपासलेली होती. असा त्यांचा व्यावहारिक दृष्टिकोण असला तरी नातेवाईकांच्या अडचणीच्या वेळी ते मदतीसाठी नेहमीच अग्रेसर असत. त्यांच्याजवळ जेव्हा पैसा आला तेव्हा त्यांनी नातेवाईकांना त्यांच्या अडचणीच्या काळात मदत केली. मोठ्या कुटुंबाचा खटला ही त्यांनीच चालविला होता. म.द. हातकणंगलेकरांच्या वडिलांच्या मृत्युनंतर त्यांनीच त्यांच्या कुटुंबाचा सांभाळ केलेला होता. म.द. हातकणंगलेकरांच्या शिक्षणासाठी वेळोवेळी मदत केली. आपल्या लहान भावाला म्हणजे रामभाऊ आरवाडे यांना एल.एल्.बी. पर्यंत शिकवले. आपल्या पत्नीच्या निराधार बहिणींना त्यांनी घरी आणले. पुढे त्यांची लग्नेही त्यांनीच लावून दिली. आपली लहान मुलगी म.द. हातकणंगलेकरांना देऊन त्यांनी लेखकांना जावई करून घेतले. दुसऱ्याला फसवावे असा विचार त्यांच्या मनामध्ये कधीच आला नाही. 'त्यांना व्यायामाचा नाद होता. पैलवानी खुराक नसला तरी व्यायामाची आवड होती. ते मारूतीचे परम भक्त होते. शनिवार करत आणि मारूतीची भक्तिभावाने सेवा करत होते. आयुष्याच्या अखेरपर्यंत उर्जितावस्था आली तरी त्यांनी हा परिपाठ सोडलेला नव्हता.'[७] आपल्या आयुष्यामध्ये आपणाला जरी शिकता आले नसले तरी घरच्या सर्वांना जितके शिकता येईल तेवढे शिकवायचे असे त्यांनी ठरविले होते. त्यामुळे आपल्या लहान भावास एल.एल्.बी. तसेच म. द. हातकणंगलेकरांना एम.ए. पर्यंत शिकण्यासाठी त्यांनी वेळोवेळी मदत केलेली होती. त्यांना शिक्षण जरी घेता आलेले नसले तरी त्यांनी वेळोवेळी अनेक शिक्षण संस्थांना मदत केलेली होती. त्याचे प्रत्यक्ष दर्शन आपणास आजही सांगली येथे 'गणपतराव आरवाडे कॉमर्स कॉलेज' च्या रूपाने दिसून येते. हे कॉलेज म्हणजे त्यांच्या भरगो.. अशा देणगीचे प्रतिक आहे, असे म्हणता येईल.

त्यांनी आयुष्यभर जिद्दीने, करारीने, दुसऱ्यांना मदत करीत आपले जीवन व्यथीत केले असले तरी त्यांच्या आयुष्याचा शेवट फारच दु:खद व त्रासदायक गेला. लहान भावाबरोबर वाटणीच्या कारणावरून त्यांचे सतत खटके उडत. असेच खटके व प्रश्न वाटणीच्या कारणावरून त्यांच्यासमोर उभा राहिला तो आपल्याच दोन मुलांच्यामध्ये संपत्तीची वाटणी करताना. अशा त्यांच्या करारी जीवनाबरोबर एक सत्य लेखक वाचकासमोर ठेवतात ते म्हणजे त्यांना 'बाहेरचा नाद' होता. हे म. द. हातकणंगलेकरांच्या फार उशिरा ध्यानात आले होते. आयुष्याच्या शेवटच्या काही वर्षामध्ये त्यांना अनेक आजाराने ग्रासलेले होते. त्याचा त्यांना खूप त्रास झाला.

त्यावेळी त्यांचे वय पंच्याहत्तरीच्या पुढे होते. मात्र सर्व आजारपणांत त्यांच्या पत्नीने म्हणजे लेखकांच्या मोठ्या मामींनी त्यांची मनापासून सेवा केली ही एकच त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसातील जमेची बाजू आहे असे आपणास म्हणता येईल.

## ११) धाकटे मामा – 'रामभाऊ आरवाडे'

म. द. हातकणंगलेकरांच्या धाकट्या मामांचे नाव रामभाऊ आरवाडे. 'धाकटे मामा मोठ्या मामांपेक्षा दहा-पंधरा वर्षांनी लहान होते. मोठ्या मामापेक्षा धाकटे मामा दिसायला रूबाबदार होते. उंचेपुरे, पीळदार शरीर, धारदार नाक, रूंद कपाळ, मानेवर मागे वळलेले विपुल केस असे प्रथमदर्शनीच दुसऱ्यावर छाप टाकणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांची वेशभूषा त्या काळात सुधारकी तरूणाला साजेशी होती. तलम धोतर, सिल्कचा शर्ट व उलनचा अगर सिल्कचा कोट, पायात पंपशूज अगर ऐटबाज चपला. परिस्थिती जशी सुधारत गेली तशी शर्टाची बटने सोन्याची झाली. गळ्यात सोन्याची साखळी आणि घड्याळाचा पट्टाही सोन्याचा झाला. ते एखाद्या नटाप्रमाणे दिसत.'[८] मोठ्या मामांची शिकण्याची इच्छा अपूर्ण राहिली असल्याने त्यांनी धाकट्या मामांना एल.एल्.बी. पर्यंत शिकवलेले होते. तसे धाकटे मामा उपजतच हुशार होते. लहानपणापासूनच त्यांना साहित्याची, वाचनाची, इंग्रजी संगीत यासारख्या विषयांची आवड होती. त्यांचे गोविंदाग्रज हे आवडते कवी होते. त्यांच्या या आवडीमध्ये व छंदामध्ये अधिकाधिक भर पडत गेली, ती पुढच्या शिक्षणाला पुण्यामध्ये गेल्यानंतर. तिथे नवनवीन मित्र त्यांच्या भोवती जमले. संगीत नाट्याचा छंद दिवसागणिक वाढत गेला. याबरोबरच टेनिस, पत्ते या ही गोष्टींची आवड पुण्यामध्येच त्यांना निर्माण झाली. असे स्वच्छंदी मुक्त पक्षासारखे जीवन जगण्याची त्यांची रीत होती. मोठ्या मामांनी साठवलेल्या पैशाला वाळवी लागलेली होती या घटनेने मोठे मामा उध्वस्त झाले होते. मात्र धाकट्या मामांनी आपल्या बुद्धिच्या व सरकारी कार्यालयातील ओळखीच्या सहाय्याने सरकारी कार्यालयात तसेच मुंबईला बऱ्याच फेऱ्या मारून तो पैसा बदलून आणला. या त्यांच्या कामगिरीचे भारी कौतुक मोठ्या मामांना होते. या त्यांच्या कामगिरीमुळे आपल्या लहान भावाचा त्यांना नेहमीच आदर व अभिमानही वाटत असे.

धाकट्या मामांनी आपल्या वकिलकीमध्ये जी 'रूद्राप्पाची केस' घेतली ती हरल्यामुळे या व्यवसायाकडे त्यांनी परत फिरून पाहिले नाही. आपल्या या व्यवसायाकडे त्यांनी पाट

फिरवली व आपल्या वकिलीचा व्यवसाय बंद केला. ते मोठ्या मामांच्या गिरणीच्या कामकाजामध्ये त्यांना मदत करू लागले. सुरूवातीच्या काही वर्षामध्ये दोघेही कष्टाने आणि प्रामाणिकपणे अहोरात्र गिरणीमध्ये राबत होते. जशी वर्षे निघून जातील तसा दोघांच्या मनामध्ये एकमेकांविषयीचा असलेल्या विश्वासाला तडा गेला. छोट्या छोट्या कारणावरून त्या दोघांमध्ये वारंवार तंटे सुरू झाले. त्यातच धाकट्या मामांना तरूणवयापासून बाहेरचा नाद जडलेला होता. या नादामुळेच, कलंदरवृत्तीने जीवन जगण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे, बुद्धिमत्ता असूनही सातत्य आणि चिकाटीच्या अभावाने व व्यसनामुळे त्यांच्यापुढे त्यांच्या जीवनामध्ये अनेक चांगल्या संधी येऊनसुद्धा त्यांच्या जीवनाला निश्चित अशी दिशा लाभली नाही. आयुष्याच्या उत्तरार्धामध्ये त्यांची प्रकृती त्यांना साथ देईनाशी झाली. लहाणपणापासून त्यांना अनेक व्यसने असल्यामुळे अनेक व्याधी सुरू झाल्या होत्या त्या बळावतच गेल्या. मूत्राशयाचा विकार, हृदयविकार अशा आजारांनी त्यांना त्रस्त केले. यामुळे ते वारंवार आजारी पडू लागले. तरूण वयामध्ये जी धाकट्या मामांची देहयष्टी लेखकांच्या नजरेसमोर होती, आणि आज आजारामुळे त्रस्त अवस्थेत मिरजेच्या हॉस्पिटलमध्ये मृत्यूसोबत झुंज देत पडलेल्या मामांची देहयष्टी या दोन्हीमध्ये जमीन–आस्मानचा फरक म. द. हातकणंगलेकरांना जाणवत होता. ते सांगतात, 'मी मामांच्या खप्पड, दाढीचे खुंट वाढलेल्या चेहऱ्याकडे पाहात होतो. त्या चेहऱ्यात त्यांच्या पूर्ववयातील उमदे, हसरे, देखणे, बेदरकार, अभिमानी चेहरे माझ्या नजरेसमोरून सरकत होते. एकाएकी मला 'हॅम्लेट' मधल्या ओळी आठवल्या, 'Good night, Sweet Prince, May Flights of angels sing thee to thy sleep.' [१] या साऱ्या आयुष्याचे ओझे हातकणंगलेकरांच्या अंत:करणावर उत्तरलेले होते.

## १२) 'पन्नास वर्षापूर्वीचे गुरूजन–विद्यार्थी'

या व्यक्तिरेखांच्या आठवणीमध्ये म.द. हातकणंगलेकरांनी पन्नास वर्षापूर्वी शिक्षण घेत असतांना आपणास भेटलेल्या शिक्षकांच्या व काही मित्रांच्या आठवणी आपल्यासमोर उलघडण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न दिसतो. या आठवणी 'सांगली हायस्कूल' व त्यानंतर 'यंग मेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटीचे प्रताप मॉडेल हायस्कूल' या दोन शाळातून शिक्षण घेत असतांना अनुभवलेल्या व्यक्तिंचे जीवन त्यांनी या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून व्यक्त केले आहे.

म..द हातकणंगलेकर आपल्या वडिलांचा मृत्यू झाल्यानंतर मामांच्या गावी म्हणजे

सांगलीला आपल्या कुटुंबासोबत राहायला आले. सांगलीला आल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांचे नाव सांगली हायस्कूलमध्ये नोंदवण्यात आले. ही शाळा संस्थानी काळात बांधलेली ब्रिटिश नमुन्याची होती. या शाळेला विस्तृत पटांगण, बाजूला अमराई अशा ठिकाणी शाळेची इमारत उभी होती. पण या शाळेतील शिक्षकवर्ग त्यांना आवडला नाही. विषयाचे शिक्षक खडूस होते असे ते सांगतात. त्यांनी काही शिक्षकांची टोपन नावेही पाडलेली होती. जसे मराठीच्या शिक्षकांना 'बटाटा', इंग्रजीच्या शिक्षकांना 'गांजाकस' अशी ती नावे होती. याच शाळेत विषयाच्या यादीत म.द. हातकणंगलेकरांना न समजणारे गायन व तालीम हे दोन विषय होते. या व अशाच कारणामुळे ही शाळा त्यांनी लवकरात लवकर सोडण्याचा निश्चय केला.

ही शाळा सोडल्यानंतर पी. एम. हायस्कूलमध्ये म्हणजे प्रताप मॉडेल या शाळेमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. या संस्थेत धडाडीचे कार्यकर्ते म्हणून सोलापूरच्या कामगार विश्वात नाव मिळवलेले आपटे बंधू होते. यापैकी दत्त आपटे हे उमदे, धडाडीचे, पैलवानी चालीचे, तसेच केस कापलेले, गाजरासारखा तांबूस गौरवर्ण आणि आत्मविश्वासाने ठासून भरलेले व्यक्तीमत्व. [१०] मुलांचा त्यांच्या भोवती नेहमी गराडा असायचा ते थोडे अरबट चरबट बोलायचे. ऐकताना मुले लाजायची पण मनातून खूष व्हायची. हे शिक्षक म.द. हातकणंगलेकरांना इंग्रजी शिकवत होते. त्या काळातील नावाजलेल्या राजकिय, नाट्य, संगीत क्षेत्रातील लोकांशी त्यांचा व्यक्तिगत परिचय होता. शाळेतील राष्ट्रीय सणादिवशी त्यांचे व्याख्यान असायचे. एकूणच शाळेला सर्व दृष्टीने त्यांचा सहवास स्फूर्तीदायक ठरायचा. बरीच वर्षे त्यांना लग्न करायला फुरसत सापडली नाही. नंतर त्यांनी एका प्रौढ महिलेशी लग्न केले तेव्हा सर्वांनाच त्याचे वाईट व आश्चर्य वाटले. आमच्याशी त्यांनी प्रतारणा केली असे लेखकांना वाटते.

याच शाळेचे हेडमास्तर हणमंतराव गोखले मोठे रूबाबदार होते. ते फार छानछोकीने राहात. सायकलवरून शाळेला रूबाबातच येत-जात असत. त्यांचा विषय इंग्रजी होता. ते म.द. हातकणंगलेकरांना सामान्य इंग्रजी, व्याकरण, वाक्प्रचार, अनेक शब्दांसाठी एक शब्द असा भाग शिकवत होते. त्यांना टेनिस, चहा व विडी या गोष्टींच्या सवयी होत्या. तसे ते स्वभावाने फार काटेकोर होते. पुढे त्यांच्याच दोन मुलांना म.द. हातकणंगलेकरांनी इंग्रजी शिकवले. मात्र ती दोघेही बुद्धीने बेताचीच निघाली. या गोष्टीचे त्यांना विषद वाटत होते. दुसरे एक शिक्षक

श्री. शं. गो. गोखले. ते म.द. हातकणंगलेकरांना मराठी शिकवत. ते 'गोरेपान' बेताच्या उंचीचे गृहस्थ, फार शिस्तीचे आणि टापटिपीने राहाणारे होते. त्यांचे शिकवणे पद्धतशीर, अक्षरं सुरेख होती. ते किर्लोस्कर मासिकात अधूनमधून कथा लिहीत असत. बलोपासना व ध्येयनिष्ठा असे त्यांच्या कथांचे विषय असत. 'परीस आणि लोखंड' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. लेखक आणि त्यांच्या मित्रांनी एक हस्तलिखित मासिक काढण्याचा बेत केला. त्यासाठी एक लेख लिहिण्याची त्यांना लेखकाकरवी विनंती करण्यात आली. त्यावर त्यांनी कविवर्य भा. रा. तांबे यांच्या एखाद्या कवितावर 'प्रकाशभाषा' नावाचा लेख लिहून दिला. त्यामध्ये असणाऱ्या काही ओळी म.द. हातकणंगलेकरांना आजही आठवतात.

" प्रकाशभाषा तुझी मधूर ती
गोंधळ उडवी इतरा चित्ती
गमेल मज ती सुंदर रीती
प्रलयमेघ गर्जले तरी" [११]

मात्र या शिक्षकाचा पुढे फारसा परिचय म.द. हातकणंगलेकरांशी राहिला नाही. आणखी एका शिक्षकाची ते आठवण सांगतात. त्यांचे नाव 'दत्तोपंत' ते काळेसावळे असले तरी दुसऱ्यावर छाप टाकणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांचा विषय 'अर्धमागधी' असला तरी ते म.द. हातकणंगलेकरांना मराठी व इंग्रजी विषय शिकवत होते. पुढे त्यांनी शाळा सोडून वकिलीचे शिक्षण घेतले आणि वकिली करू लागले. पुढे त्यांनी याच व्यवसायात खूप पैसा मिळवला. अनेक स्त्रियांचा सहवास ही त्यांना मिळाला.

या आठवणी जशा शिक्षकांच्या आहेत तशाच काही विद्यार्थ्यांच्या ही आहेत.

म.द. हातकणंगलेकरांच्या वर्गामध्ये दोन विद्यार्थीनी होत्या. त्यापैकी एक ब्राह्मण जातीची, ती काळीसावळी, नकट्या नाकाची, अंगाने स्थूल, नऊवारी नेसणारी होती. तिच्याशी त्यांच्याच वर्गात शिकणाऱ्या एका धडधाकट मुलाची सलगी होती.

दुसरी विद्यार्थिनी, विद्यार्थिनी नसून ती 'बाई' होती. उंचीपुरी गोरी, गुजराथी-पारशी राहणीमान असलेली होती. श्रीमंती पोषाख अशी नेहमी तिची राहणी असल्याने तिच्याशी सगळे आदबीने वागायचे. तिच्या आईचे गावातल्या एका घरंदाज ब्राह्मण डॉक्टरशी मैत्रीचे संबंध होते,

घरोबा होता. ही मुलगी त्या बाईच्या पूर्वसंबंधातली असावी असे म.द. हातकणंगलेकरांना वाटायचे. पुढे ती मुलगी मुंबईत नर्स म्हणून काम करत असल्याचे समजले.

याबरोबर बिरनाळे बनिजवाडकर, रामचंद्र, जगन्नाथ शंकरशेठ अशा काही मित्रांच्याही आठवणी लेखक या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून वाचकासमोर उभ्या करतात. त्यांच्या सहवासातील सुगंध जो त्यांच्या मनामध्ये दरवळत आहे, त्या सुगंधी दरवळणाऱ्या आठवणी आपणासमोर चित्रीत करतात. लेखकांना सायन्स विषयात नव्वद टक्के गुण मिळालेले होते. यासाठी त्यांना 'कुटेला जगन्नाथ' शंकरसेठ पारितोषिक मिळाले होते. या निकालाचा त्यांना आनंद व आश्यर्चही वाटले होते. त्या आठवणीही या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून म.द. हातकणंगलेकर यांनी या ठिकाणी ओझरतेपणी नमूद केलेल्या आहेत.

१३) 'सुहृध्द् पत्नी'

या व्यक्तीचित्रणामध्ये म.द हातकणंगलेकरांनी आपल्या धर्मपत्नीसंदर्भात लेखन केलेले आहे. हे लेखन मोजकेच परंतु लक्षवेधी आहे. म.द. हातकणंगलेकर स्वत:विषयी, स्वत:च्या कुटुंबाविषयी फारसे कोठे काही बोलत अगर लिहित नाहीत. मात्र या संग्रहाचे लेखन करण्याचे कारण वेगळेच आहे. ते त्यांनी या संग्रहाच्या सुरूवातीस स्पष्ट केले आहे. ते म्हणतात माझे लेखन चालू असताना पत्नी एकदा म्हणाली, "तुम्ही तुमच्या आई-वडील, आजी, आत्या, भाऊ-बहिण, दोन्ही मामा, मित्र यांच्याबद्दल लिहिलं असं दिसतं. माझ्याबद्दल, मुलांबद्दल काही लिहावंसं वाटलं की नाही?"[१२] या पत्नीच्या बोलण्याने लेखक ओशाळले या अपराधाची मोठी भरपाई म्हणून त्यांनी लिहिण्याचे ठरवले. आपल्या पत्नीचे आपल्या जीवनामध्ये असणारे अनन्यसाधारण महत्त्व तिच्या व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून वाचकासमोर हातकणंगलेकर उभे करतात.

म.द. हातकणंकलेकरांचे शिक्षण संपल्यावर त्यांच्या लग्नासंबंधी हालचाली सुरू झाल्या. वडिलांच्या अपघाती मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला मोठ्या मामांचा आश्रय मिळाला होता. त्यांच्या उपकारामुळे लहान मुलीशी मी लग्न करावे अशी आई बरोबर इतरांचीही इच्छा होती. लेखकांना आई काकुळतीने विनवणी करीत होती. "तुझे वडील गेल्यावर मामाचाच आपल्याला आधार होता. नाही तर आपण कुठे गेलो असतो? मुलगी दिसायला चांगली आहे. तू कां नको म्हणतोस?"[१३] त्याच वेळी लेखकांना धारवाडला नोकरी लागली. संसार सुरू करण्यासाठी

दोघेही धारवाडला आले. आपला स्वभाव अभ्यासू. इन्ट्रोव्हर्ट. 'स्वत:त रमणारा' मात्र त्यांची पत्नी सौ. सुधा कोवळ्या वयाची, बाह्य गोष्टीत रमणारी (एक्स्ट्रोव्हर्ट) तिचा स्वभाव शांत, समंजस, असा होता. म.द. हातकणंगलेकर आणि त्यांची पत्नी या दोघांच्या स्वभावात वेगळेपणा होता. तरीही त्यांच्या पत्नीने लेखकांना त्यांचे लेखन, वाचन, ज्ञानसाधना चालू असताना अखंड साथ दिली.

म.द. हातकणंगलेकरांच्या स्वभावगुणामुळे त्यांनी आपल्या पत्निविषयी व कुटुंबाविषयी जे लेखन केले नाही त्याविषयी श्री. पु. भागवतानी त्यांच्याविषयी म्हटले आहे. म.द. हातकणंगलेकरांच्या एकूणच व्यक्तिमत्वात बोलण्याचा उत्साह कमी, मितभाषी व मन:पूर्वक स्नेह आणि कार्यनिष्ठा अधिक. त्यामुळे सकृतदर्शनी ते अलिप्त व कोरडे वाटतात. परंतु मनाच्या गाभ्यात ते चांगलेच भावनाशील, हळवे आहेत. हे त्यांच्याशी जवळीक साधणाऱ्यांना अनुभवास येते. त्यांच्या आयुष्यातले सारे तपशील त्यांना ओळखणाऱ्यांना निटसे माहीत नाहीत. स्वत:विषयी, स्वत:च्या कुटुंबीयांविषयी ते फार कमी बोलतात हे त्यांचं एक प्रमुख कारण आहे. 'उघडझाप' साठी ते आपल्या आयुष्याची बाराखडी लिहीत असताना त्यांच्या पत्नीला सौ. सुधाताईंना राहवलं नाही. त्या म्हणाल्या, तुम्ही अनेकांविषयी लिहिलंय. माझ्याबद्दल, मुलाबद्दल काही लिहावंसं वाटलं नाही? मात्र तो प्रश्न ऐकून ओशाळलेल्या म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या खाजगी आयुष्याविषयी फार त्रोटक लिहिलंय. माझी बायको बाह्यगोष्टीत रमणारी एक्स्ट्रोव्हर्ट. मी इण्ट्रोव्हर्ट–स्वत:त रमणारा–असं त्यांनी नमूद केलंय. अशा स्वभावाची त्यांची पत्नि जीवनामध्ये उद्भवणारी संकटे. त्यापासून निर्माण होणारे दु:ख शांतपणे पचवत होत्या. हीच त्यांची साथ म.द. हातकणंगलेकरांचे आपल्या जीवनातील एक सामर्थ्य असावे असे वाटते.

१४) **'स्वच्छंदी मनाचा मित्र'**

या व्यक्तिरेखेमध्ये जन्मजातच जे जगरहाटीच्या बंधनापासून अलिप्त असतात, जो जगरहाटीच्या बंधनामध्ये कधीही बांधला गेलेला नव्हता अशा मित्राचे व्यक्तिचित्र म.द. हातकणंगलेकरांनी रेखाटलेले आहे. या मित्राचे वागणे व्यवहाराच्या दृष्टीने विसंगत होते. मात्र ते स्वत:च्या मनामध्ये जे विचार येतील, स्वत:ला जे आवडेल त्याच विचाराने जीवन जगणारे मनमानी स्वभावाचे व्यक्तिमत्त्व होते. ते झुऑलॉजीकचे प्राध्यापक होते. नोकरी करीत असताना एके ठिकाणी त्यांनी दोन किंवा तीन वर्षापेक्षा अधिक काळ कुठेच नोकरी केलेली नाही. त्याचे

कारण त्यांचा मानी स्वभाव. त्यामुळे दुसऱ्यासाठी, स्वत:साठी अथवा कोणत्याही कारणाने त्यांचे काम करीत असलेल्या अधिकाऱ्याशी छोट्या छोट्या गोष्टीमधून मतभेद निर्माण होत असत. अशा परिस्थितीत ते पटकन राजीनामा देत असत. या त्याच्या स्वभावाने प्रतिष्ठित असलेल्या शिक्षण संस्थेच्या आजीव सभासदाच्या पदाचा त्यांनी तडकाफडकी राजीनामा दिलेला होता. अशा उपजत स्वभावामुळे झुऑलॉजीचे उत्तम, विद्यार्थीप्रिय, स्वतंत्र विचाराचे प्राध्यापक म्हणून महाविद्यालयीन, विश्वविद्यालयीन स्तरावर लौकिक मिळवला असतानाही ते कुठेच स्थिर होऊ शकले नाहीत. झुऑलॉजीचे निष्णांत प्राध्यापक असून त्यांचा गुरूवर मोठा विश्वास होता. स्वत:च्या मन:शांतीसाठी ते मुक्तपणे आयुष्याच्या अखेरपर्यंत जगत राहिले. मरण देखील त्यांनी तितक्याच सहजतेने स्वीकारलेले होते. असे हे श्रद्धावंताचे निर्वाण जगणे होते. जीवनात ते अत्यंत शुद्ध चारित्र्याने शेवटपर्यंत जगत राहिले. त्यांच्या या पारदर्शी जगण्याबद्दल म.द. हातकणंगलेकर, विशुद्ध अशा भावनेने त्यांचे व्यक्तिचित्र रेखाटतात.

### १७) 'इंग्लंडमध्ये भेटलेले महाराष्ट्रीयन चित्रकार'

या व्यक्तिरेखेमध्ये म.द. हातकणंगलेकरांनी इंग्लंडमध्ये जे महिनाभर वास्तव्य केलेले होते, या वास्तवामध्ये त्यांना भेटलेल्या महाराष्ट्रीयन चित्रकारांचे वेगळेपण व्यक्त केलेले आहे. इंग्लंडमध्ये म.द. हातकणंगलेकरांचे वास्तव्य तीन ऑगस्ट ते तीन सप्टेंबर असे होते. ते एक महिना आपल्या मित्रांसोबत दौऱ्याला गेले होते. या प्रवासात इंग्लंडमध्ये वास्तव्य करून राहिलेले 'वसंत चिंचवडकर' व 'माळी' या दोन महाराष्ट्रीयन चित्रकारांच्या भेटीचा योग आला. त्या दोन चित्रकारांचे व्यक्तिचित्र या लेखामध्ये त्यांनी सांगितलेले आहे. त्या दोघांच्याही चित्रकलेचे एक विशेष म्हणजे त्या दोघांनीही आपल्या चित्रकलेने स्वत:चे एक वेगळे 'रूप आणि तंत्र' धारण केलेले होते. या चित्रकारांच्या व्यक्तिमत्वाविषयी म.द. हातकणंगलेकर सांगतात, "अर्थात मला आधुनिक चित्रकलेसंबंधी सांगायचे नसून या प्रवाहात जगणाऱ्या चित्रकारांसंबंधी सांगायचे आहे." [१४]

चित्रकार वसंत चिंचवडकर हे १९७८ साली इंग्लंडला आले आणि इंग्लंडमध्येच स्थायिक झाले. चिंचवडकर हे उमद्या, भावूक, सरळ, स्वागतशील मनाचे होते. चिंचवडकरांनी म.द. हातकणंगलेकर व त्यांच्या मित्रांचे यथोचित स्वागत, त्याबरोबर त्यांच्या राहाण्याची, जेवणाची

उत्तम सोय केलेली होती. आस्थेवाईकपणे त्यांनी ती सोय आपल्या राहत्या घरातच केली होती. चिंचवडकरांनी इंग्लंडमधील बराच निसर्गमय भाग म.द. हातकणंगलेकर व त्यांच्या मित्रांना फिरवून दाखवलेला होता. आज ते इंग्लंडमध्ये जरी राहात असले तरी त्यांना आपल्या मूळगावी म्हणजे इंदूरला येण्याची इच्छा होती. चिंचवाडकरांच्या या विचारातून त्यांना परदेशात राहताना आपल्या मनामध्ये असलेल्या मातृभूमीविषयीची ओढ कशी सतावत होती, हे दिसून येते. याचे प्रत्ययकारी चित्रण या व्यक्तिचित्रणातून रेखाटलेले आहे.

दुसरे भारतीय चित्रकार 'माळी'. हे माळी अतिशय व्यवहारवादी दृष्टीने आपले जीवन व्यथित करणारे होते. ते कुणाशीही अधिक संपर्क ठेवू पाहात नव्हते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयीचे एक विशेष लेखक सांगतात की, 'माळी नेहमी आपल्याच मस्तीत जगत असत. याचे कारण त्यांचे पूर्वायुष्य होते.'' हे नंतर लेखकांच्या लक्षात आले. अशी दोन ध्रुवावरच्या दोन टोकासारखे आपले जीवन जगत असणाऱ्या कलावंताचे नमुने म.द. हातकणंगलेकरांना इंग्लंडमध्ये प्रत्ययास आले. अशा चित्रकारांची व्यक्तिचित्रे लेखकांनी अतिशय मार्मिक शब्दांत रेखाटली आहेत.

**१६) 'कौटुंबिक जिव्हाळ्याची नाती'**

म.द. हातकणंगलेकरांना एक मुलगा व दोन मुली आहेत. मुलांचे नाव प्रदिप. तो आय.आय.टी तून बी.टेक. एम.टेक झालेला आहे. पीएच.डी. नंतर बेंगलोर येथे तो एका चांगल्या कंपनीत काम करतो आहे. त्याने रेखा पटवर्धन या मुलीशी प्रेमविवाह केला आहे. म.द. हातकणंगलेकरांना चारवी या आपल्या नातवाबद्दल विशेष कुतुहल वाटते. त्याची हुशारी पाहून त्यांना अभिमानही वाटतो. आपल्या मुलाचा चाललेला हा सुखी संसार बघितल्यावर त्यांना समाधान वाटते. त्यांची मोठी मुलगी रेवती. रेवती ही वालचंद कॉलेजमध्ये मानसशास्त्र या विषयाची प्राध्यापिका आहे. ती आपले जीवन नोकरीबरोबर मतीमंद मुलांच्या संगोपणात व्यथीत करते. १९८६ साली तिने मतिमंद मुलांसाठी शाळा स्थापन करून समाजसेवेचे व्रत हाती घेतले आहे. त्यांची लहान मुलगी 'विश्रब्धा' हिचा विवाह गो. मा. पवार यांच्या मुलाशी म्हणजे राहूल पवार यांच्याशी झाला. ती डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेजमध्ये पॅथॉलॉजी विभागात लेक्चरर आहे. तिचा नवरा इंजिनिअर आहे. आपल्या मुलांविषयी म. द. हातकणंगलेकरांनी फारच साध्या भाषेत सांगितले आहे. आणि तेच रोचक वाटते.

## १७) 'जी.ए. नावाचं कोडं'

या व्यक्तिरेखेमध्ये म.द. हातकणंगलेकरांना अनुभवास आलेले जी.ए. कुलकर्णी त्यांनी चितारले आहे. जी.एं.चे व्यक्तिमत्त्व म.द. हातकणंकलेकरांनी 'जी.ए. नावाचं कोडं' या शिर्षकाच्या माध्यमातून वाचकासमोर उभे केलेले आहे, हेच त्यांचे वेगळेपण. जी.ए. कुलकर्णींच्या सहवासातील प्रत्यक्ष आलेल्या अनुभवांचे चार लेख संग्रहित करून त्यांचा समावेश या व्यक्तिरेखेमध्ये केलेला आहे. या चार लेखापैकी पहिले दोन लेख जी.एं.च्या प्रत्यक्ष सहवासाचा जो प्रत्यय म.द. हातकणकंगलेकरांना आलेला आहे, त्या सहवासातील प्रत्ययाचे वर्णन केलेले आहे. तर उरलेल्या दोन लेखामध्ये म.द. हातकणंगलेकरांच्या अन्य व्यक्तिविषयक लेखांच्याहून वेगळ्या प्रकारचे आहेत.

म.द. हातकणंगलेकर धारवाडला असताना त्यांच्याशी मराठीतील श्रेष्ठ कथाकार जी.एं.ची दृढ मैत्री झाली. जी.एं.चे व्यक्तिमत्त्व मृदू, मुलायम, रूजू, वक्तशीर, स्वाभिमानी असे होते. जी. ए. स्वत: करड्या शिस्तीचे पालन करणारे होते. या त्यांच्या स्वभावामुळे 'कलावंत' म्हणून ते इतरांना सहजासहजी भेटत नसत. शक्य होईल तेवढी ते भेट टाळत असत. कोणाशी संबंध ठेवीत नसत. याचे कारण ते सांगतात. लोकांच्या वारंवार भेटीमुळे एकतर साहित्यनिर्मितीचा वेळ वाया जातो. त्याचबरोबर दुसऱ्याकडून त्यांना काहीही नको असते. मग ती भेट असो किंवा सहानुभूती असो. त्यांना असे वाटे की जर मैत्रीचे संबंध निर्माण झाले की माणसाच्या वागण्यात त्यांच्या शिस्तबद्ध जीवनात शिथिलता येते. त्याचा अनेकजण गैरफायदा घेतात. या त्यांच्या स्वभावामुळे जी.ए.चे वागणे लोकविलक्षणच नव्हे तर विक्षिप्तपणाचे वाटते. असे त्यांचे व्यक्तिमत्त्व व स्वभाव असतानाही हातकणंगलेकरांची त्यांच्याशी चांगली मैत्री निर्माण झाली होती. हेच एक आश्चर्यकारक आहे. त्यांना जी.एं.नी स्वत:भोवती जे कवच निर्माण केले होते ते कवच भेदून त्यांचे व्यक्तिमत्व जवळून अनुभवता आले.म.द. हातकणंगलेकरांचे हे अपवादभूत जी.एं.चे जिव्हाळ्याचे मित्र असल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे आहे? हे त्यांच्या चाहत्यांना व एकंदरीत मराठी वाचकांना उलगडून दाखवण्याची वाङ्मयीन व सांस्कृतिक जबाबदारी म.द. हातकणंगलेकर यांच्यावर आलेली होती. ती आपल्यावर असलेली जबाबदारी त्यांनी उत्तम प्रकारे निभावलेली आहे. म.द. हातकणंगलेकरांनी जी.एं.च्या लौकिक जीवनाचा संदर्भ

त्यांच्या कथेतून कसा व्यक्त झाला आहे, याचा शोध घेतलेला आहे. त्यांच्या कथांची निर्मिती आणि एका कलावंताच्या मनामध्ये साहित्य निर्मितीच्या वेळी चाललेल्या अस्वस्थ खळबळीचा वेध घेण्याचा प्रयत्न जी. एं.च्या व्यक्तिमत्त्वामधून म.द. हातकणंगलेकरांनी केलेला आहे. जी.एं.चे वाङ्मयीन आणि व्यवहारीक व्यक्तिमत्व हातकणंगलेकरांनी 'जी.ए. नावाचं कोडं' या व्यक्तिरेखेमध्ये स्वाभाविकपणे रेखाटलेले आहे.

जी.एं.चा जो प्रत्यक्ष सहवास म.द. हातकणंगलेकरांना लाभला त्या सहवासामध्ये जी.ए. चा स्वभाव, त्यांच्या आवडीनिवडी या त्यांच्या प्रत्यक्ष सहवासामधून लेखकांना मिळालेल्या आहेत. जी.ए. फक्त लेखकच नव्हते तर ते उत्तम वाचकही होते. हा त्यांच्यातील वाचक म्हणून जे वेगळेपण होते त्यावर म.द. हातकणंगलेकर आपल्या या लेखाच्या शेवटी पत्राच्या माध्यमातून प्रकाश टाकतात. त्या दृष्टीने जी.ए. यांनी लिहिलेल्या पत्रातील पुढील विधान महत्त्वपूर्ण वाटते.

''माणसाला माणूस म्हणून जगताना जे अटळपणे भोगावे लागते, तेच केवळ वाङ्मयविषय होऊ शकते. त्याच्यावर काहीतरी व्यवहारिक तोडगा आहे, असे काहीही इतके ऐपतदार होऊ शकत नाही. एखाद्या गावात पाणवठा नाही, ही गोष्ट काही वाङ्मयाचा विषय नाही. King lear आणि वृध्दाश्रमाची गरज दाखवणारे नाटक यांच्यात काही मूलभूत फरक आहे, असे नाही तुम्हाला वाटत? मॅकबेथ मधील ट्रॅजिडी हे सामंतशाहीचे वास्तवपूर्ण चित्रण आहे, असे एखादा Confirmed Marxist देखील म्हणू शकत नाही. त्यातील शोकांतिकेचे बीज निराळे आहे.'' [१५]

या व्यक्तिचित्रणाबरोबरच म. द. हातकणंगलेकरांनी काही स्थळकाळाची जिवंत चित्रणं उभी केलेली आहे. ती यापुढील भागात अभ्यासलेली आहेत.

### क) 'विलिंग्डन महाविद्यालयातील दिवस'

विलिंग्डन महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना अनुभवलेले दिवस या आठवणी आहेत. या कॉलेजचा त्यांना शाळकरी वयात असल्यापासून लळा होता. आपणास येथे जाता येईल, असा विचारदेखील ते करू शकत नव्हते. मॅट्रिकच्या परीक्षेत म.द. हातकणंगलेकरांना ऐंशी टक्क्याहून अधिक मार्क्स मिळाले असल्याने ते सायन्स या विभागाकडे जाणार असे सर्वांनी गृहीतच धरले होते. तरीही त्यांनी विलिंग्डन महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतला. या

विद्यालयामध्ये त्यांना इंग्रजी या विषयाकरीता प्रा. यार्दी जे पुढे म.द. हातकणंगलेकरांचे स्नेही बनले, मराठीसाठी कवी गिरीश, तर संस्कृतसाठी डॉ. मुगळी व अर्धमागधीसाठी प्रा. मराठे अशा नामवंत शिक्षकांचा सहवास लाभलेला होता. डॉ. मुगळी 'स्वप्नवासवदत्ता' हे नाटक शिकवत असतांना म.द. हातकणंगलेकरांनी विद्यार्थी दशेतच या नाटकाचे रसग्रहण करणारा एक दीर्घ लेख इंग्रजीमध्ये लिहिला होता. या त्यांच्या प्रयत्नामुळे डॉ. मुगळी यांना आनंद झाला. त्यांचे त्यांना आश्चर्य वाटले. व त्यांनी म.द. हातकणंगलेकरांचे कौतुक केले. त्यांना ग्रंथालयाच्या विशेष सवलती दिल्या. याच कॉलेजमधील प्राचार्य पंडित आणि मुगळीसरांनी राजेसाहेबांच्या विद्याप्रेमामुळे अनेक विख्यात विद्वानांची व्याख्याने कॉलेजमध्ये आयोजित केली. यामध्ये डॉ. राधाकृष्णन, सी.व्ही. रामन, लेडी रामन, बॅरिस्टर जयकर, बॅरिस्टर खर्डेकर या विख्यात विद्वानांच्या व्याख्यानांचा त्यांच्या विचारांचा लाभ म.द. हातकणंकलेकरांना विलिंग्डनमध्ये घेता आला. याच महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना वि. स. खांडेकर, अनंत काणेकर, प्र.के. अत्रे, कवी यशवंत आदि नामवंत साहित्यिकांच्या विचारांचाही अनमोल ठेवा विद्यार्थीदशेत असताना मिळालेला होता. तर्कशास्त्र शिकवण्यासाठी प्रा. दि. य. देशपांडे हे शिक्षक होते. ते मोठे रूबाबदार आणि आत्मविश्वासाने शिकवत होते. या शिक्षकाचा सहवास पहिल्या टर्मपर्यंत म.द. हातकणंगलेकरांना लाभला. तरीही म.द. हातकणंगलेकरांनी तर्कशास्त्र हाच विषय निवडला. या विषयात त्यांना पाहिला वर्ग मिळाला. तर्कशास्त्राची 'सेल्बी शिष्यवृत्ती' ही त्यांना मिळाली. या शिष्यवृत्तीमुळे त्यांना मुंबईला शिकण्यासाठी जाण्याचा अनेक मित्रांनी सल्ला दिला होता. त्यांनी आपल्या मित्रांचा सल्ला न मानता सांगली या मामांच्या गावी राहून आपले पुढील शिक्षण पूर्ण केले. विलिंग्डनला असताना त्यांना जागतिक कीर्तीचे प्राध्यापक एच.बी. कुलकर्णी, तसेच प्रा.भा. म. गोरे अशा शिक्षकांच्या बुद्धिचा आणि विचारांचा अनमोल ठेवा मिळाला. या सर्वच शिक्षकांचा त्यांच्या मनावर मोठा प्रभाव होता. याच काळात त्यांनी चेकाव्ह, कोलरीज, टॉलस्टॉय यासारख्या अनेक लेखकांचे साहित्य वाचून काढले. विलिंग्डन मधील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे म.द. हातकणंगलेकरांच्या व्यक्तिमत्त्वाला विकसित करण्यास अधिक अवसर मिळाला. असे अवांतर वाचन करीत असताना आपल्या अभ्यासाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. स्वत:ला घडविण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. याचे फलित म्हणजे ते बी.ए. चांगल्या मार्कांनी पास

झाले. त्याबरोबर मुंबई विद्यापीठातील प्रतिष्ठित मानले जाणारे इंग्रजीचे 'एलिस' पारितोषिक त्यांना मिळाले. हे पारितोषिक मिळाल्यामुळे त्यांनी मुंबई विद्यापीठात शिक्षणासाठी जावे अशी मित्रांची, नातलगांची इच्छा होत. मात्र प्रिन्सिपॉल पंडित यांनी दिलेल्या सल्ल्यामुळे ते पुढील शिक्षणासाठी सांगलीतच थांबले. त्यांनी त्यांची फेलो म्हणून नियुक्ती केली. त्याबरोबर सुपरिटेंडेंट म्हणून काम देऊन विनामुल्य खोली त्यांना देण्यात आली. एम.ए. च्या वेळेस पु.ल. देशपांडे त्यांच्याबरोबर विलिंग्डन मध्ये आले होते. पु.लं.च्या बरोबर बऱ्याच वेळा जी वाङ्मयीन चर्चा होत होती, त्यामुळे त्यांचा वाङ्मयविषयक आत्मविश्वास अधिक दृढ होत होता. याच वर्षात म.द. हातकणंगलेकरांनी बरेच मराठी लेखन केले, अनेक कथांचे अनुवादही केलेले आहेत.

२अ) **'अर्धशतकातील स्मरणे'**

या आठवणींच्या संग्रहामध्ये म.द. हातकणंगलेकर पन्नास वर्षापूर्वीचा सामाजिक, राजकिय काळ कसा होता, त्या पन्नास वर्षामध्ये झालेले चढउतार, चांगल्या वाईट घटनांचा , प्रसंगांचा समालोचक पद्धतीने त्यांनी आढावा या लेखामध्ये घेतलेला आहे.

पन्नास वर्षापूर्वीच्या आपल्या गत जीवनाचा आढावा घेताना त्यांना आपल्या बालपणापासूनच्या गतजीवनाची आठवण होते. या आठवणीमध्ये ते रंगून जातात, गढून जातात. या आठवणी व्यक्त करतांना त्यांना यत्किंचितही ओशाळलेपणा वाटत नाही. हिच आपल्या मनातील भावना या लेखाच्या सुरूवातीस त्यांनी स्वतःच व्यक्त केली आहे. 'मन किती मागे धावते !' धुक्यात हरवलेल्या आठवणींचा परिसर ! मन हळवे भावुक बनते का? बनते. त्यात कमीपणा ओशाळवाणेपणा वाटण्याचे काही कारण दिसत नाही.

म.द. हातकणंगलेकरांचा जन्म हा देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा आहे. देशाला स्वातंत्र्या मिळवून देण्यासाठी करण्यात आलेल्या अनेक चळवळींचे ते साक्षी आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या देशसेवेचे व्रत घेतलेल्या देशभक्तांचे मोहळ वसंतदादांच्या भोवती सांगलीत होते. भगतसिंग, राजगुरू या तरूण क्रांतीकारकांचे फोटो अनेकांच्या घरामध्ये लावलेले होते. रत्नाप्पा कुंभार, माधवराव बागल यांनी याच काळात 'प्रजापरिषदेची चळवळ' सुरू केली होती. १९४२ ची चळवळ देशाच्या सर्व भागात पोहोचली होती. त्यावेळी लेखक हायस्कूलचे शिक्षण घेत होते. देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर गांधीची हत्या करण्यात आली. ब्राह्मणांविरोधी विध्वंसक

विचार पूर्ण देशभर पसरले. त्याचे तीव्र पडसाद पूर्ण देशभर उमटले. याचाही उलघडा 'उघडझाप' मधून ते आपणासमोर ठेवतात.

भारताला स्वातंत्र्य मिळाले. मात्र शिक्षण क्षेत्रातील विचार प्रवाह पन्नास वर्षानंतर चिंताजनक बनले. कॉलेज हे मौजमजा करण्याचे ठिकाण, दंगेधोपे, धमक्या, व्यसनाधिनता इत्यादीसाठीच असतात अशी नवीन विचारधारा निर्माण झाली. या विषयी म.द. हातकणंगलेकर म्हणतात, ''आता वेळ अशी आली आहे की, महाविद्यालयाची देखरेख करण्याचे काम पोलिसांनी हाती घ्यावे. आम्ही शिक्षण देण्याचे काम करू. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षाच्या काळात शिक्षण क्षेत्रात स्वातंत्र्याची विपर्यस्त कल्पना फोफावली आहे आणि प्रत्यक्ष शिक्षणाला ओहोटी लागली आहे.'[१६] याबरोबर शासनाच्या कमिट्या, साहित्य संस्कृती मंडळ, साहित्य अकादमी, महाराष्ट्रातील विविध साहित्य पारितोषिक संस्था यांचा कारभार नीट चालत नाही अशी ते खंत व्यक्त करतात. याचा अनुभव त्यांना वेगवेगळ्या समित्यांवर काम करताना आला. ते निवड समितीवर असताना जी.ए. कुलकर्णी यांच्या नावाची 'ज्ञानपीठ पुरस्कारासाठी' सतत तीन चार वर्षे शिफारस करीत होते. मात्र दिल्ली येथील कमिटीतील लोकांना जी.ए. कुलकर्णी कोण, हे माहित नव्हते. हा कटू अनुभव त्यांनी नोंदवला आहे.

१९८६ साली त्यांच्या मोठ्या मुलीने मतिमंद मुलांसाठी एक संस्था व शाळा सुरू केली. या शाळेसाठी शासनाची मदत मिळते हे त्यांना उशिरा कळले. मात्र अनुदानासंदर्भात शासकीय अधिकाऱ्यांकडून त्यांना आलेल्या कटू अनुभवाची नोंद ते करतात. आपण स्वतंत्र झालो. स्वातंत्र्यंनंतर जगातील सर्वात मोठी लोकशाही आपल्या देशामध्ये सुरू झाली. तिला पन्नास वर्षे होऊन गेली तरीही सगळा खेळखंडोबा आणि भ्रष्टाचार सुरूच आहे. या पन्नास वर्षातील सर्व गोष्टींवर म.द. हातकणंगलेकर अंर्तमुख होऊन प्रकाश टाकतात. आजमितीला नीतीमूल्ये, संस्कार विसरलेला समाज दिशाहीनतेने कसा भरकटत चालला आहे याचे विदारक चित्र ते आपल्यासमोर उघडे करतात.

**ग) 'पाणकळा'**

या आठवणींमध्ये लेखक म.द. हातकणंगलेकर यांनी आपल्या शेतातील घरामध्ये एक-दोन महिन्यासाठी राहायला गेल्यानंतर जे अनुभव आले ते व निसर्गाच्या सानिध्यात जे

स्वच्छंदी जीवन अनुभवायला आले, त्यातील अनुभव 'पाणकळा' या शिर्षकाच्या माध्यमातून वाचकासमोर उभे केलेले आहे. यामध्ये पाण्याचा आलेला प्रत्यय, म्हणजे निसर्गाशी त्यांचा असलेला संबंध अधिक दृढ करतो. मात्र मोठेपणी शिक्षणासाठी लेखक सांगलीला म्हणजे खेड्यापासून दूरावून शहरी जीवनाच्या सानिध्यात येतात. त्यामुळे त्यांचा निसर्गाचा संबंध कमी कमी होत जातो. हा निसर्गाशी, पाण्याशी असणारा संबंध दुरावल्यामुळे जी त्यांच्या मनाला हूरहूर लागली होती ती पाणकळ्यातील एका प्रसंग चित्रणातून म. द. हातकणंगलेकरांनी रेखाटलेली आहे.

१९४८ ला म.द. हातकणंगलेकर बी.ए. झाले. गरज असल्याने नोकरी करून अर्थाजन करावे अशी अपेक्षा घरच्याकडून व्यक्त झाली. त्याचवेळी वयाने आणि अनुभवाने मोठ्या असणाऱ्या विद्यार्थ्यांशी त्यांची निकटची मैत्री निर्माण झाली. तो शाळेत संस्कृतचा शिक्षक म्हणून अर्धवेळ नोकरी करीत–करीत कॉलेजमध्ये शिकत होता. त्याचा आग्रह असल्याने दोघांनी एकाच शाळेत नोकरी शोधायचे ठरविले होते. त्यांच्या विचारानुसार दोघांनाही एकाच शाळेमध्ये तासगावच्या हायस्कूलमध्ये नोकरी मिळाली. तिथे राहायला गेल्यानंतर सुरूवातीस त्यांच्या समोर अनंत अडचणी उभ्या राहिल्या. राहायची जागा, पाण्यासाठी आंघोळीसाठी आडावरती जावे लागे. उघड्यावर थंड पाण्याने आंघोळ करावी लागे. खानावळीमध्ये जेवण्यासाठी गेल्यानंतर त्यांचा होणारा कोंडमारा इत्यादी गोष्टींना ते कंटाळले. त्यामुळे थोड्याच दिवसात तासगाव सोडण्याचा त्यांनी निर्णय घेतला. म. द. हातकणंगलेकरांचे बालपण खेडेगावात गेले असले तरी आज ते निसर्गापासून, खेड्यापासून कितीतरी दूर एका वेगळ्या विश्वात पोहोचलेले आहेत, याचा प्रत्यय वाचकांना पावलोपावली जाणवतो. तासगाव सोडून परत सांगलीला येत असताना बालपणातील अनुभवलेला एक अनुभव प्रत्यक्ष त्याच्या समोर उभा राहतो. मळ्यामध्ये राहायला गेल्यानंतर पावसाळ्याच्या दिवसामध्ये तुडूंब वाहणाऱ्या ओढ्याचा जो त्यांनी अनुभव अनुभवलेला होता, तसाच अनुभव तासगाव सोडून जाताना त्याच्यासमोर उभा राहतो. मात्र बालपणामध्ये खळाळणाऱ्या पाण्यामध्ये एकजीव झालेले मन व त्यामुळे त्यांना मिळालेला आनंद हा तासगाव सोडताना लुटता आला नाही. या गोष्टीचा त्यांच्या मनाला चटका लागतो. हे निसर्गापासून दुरावत जाणारे नाते व मनामध्ये आलेला विचार व्यक्त करताना ते सांगतात, ''अखेरचा काठावरच्या चिखलाला लागलो आणि सारी ओल आणि राड घेऊन एस.टी.त बसलो. मनाला

गार सुरकुत्या पडल्या होत्या. घरी पोहोचलो तेव्हा आकरा वाजले होते. पाण्याची सवय सुटल्याने अशी परवड झाली होती. जगण्याची ही दिशा काही ठीक नव्हती.''[१७] निसर्गापासून आपण दुरावत जात असलेली हुरहूर आजही त्यांच्या मनामध्ये असलेली आपणास जाणवते.

ढ) 'अमृत महोत्सव'

या आठवणीच्या संग्रहामध्ये म.द. हातकणंगलेकर यांनी आपल्या ७५ व्या वर्षांच्या निमित्ताने जो 'नागरी सत्कार' करण्यात आला त्या प्रसंगाचे अनुभव कथन केले आहे. या नागरी सत्कारापूर्वीही म.द. हातकणंगलेकरांचे काही सत्कार झालेले होते. त्याचा ही येथे ओघानेच ते उल्लेख करतात.

वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यावर १ फेब्रुवारी १९८७ ला ते महाविद्यालयाच्या सेवेतून निवृत्त झाले. या निवृत्ती निमित्त त्यांचा मोठा सत्कार करण्यात आलेला होता. त्या समारंभाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते. या कार्यक्रमासाठी त्यांचे सहकारी प्राध्यापक, स्नेहीमंडळी, विद्यार्थी हे बहुसंख्याने उपस्थित होते. नंतर ७१ व्या वर्षी असाच एक समारंभ मित्रमंडळीने केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. चंद्रशेखर जहागीरदार यांनी 'तौलनिक साहित्यअभ्यास' हा गौरव ग्रंथ संपादित केलेला आहे. असाच आणखी एक आनंददायी हा छोटासा सत्कार समारंभ.

यानंतर 'अमृत महोत्सव' च्या निमित्ताने सत्कार समारंभ झाला. या कार्यक्रमाची पूर्वकल्पना म.द. हातकणंगलेकरांना नव्हती. त्यांचे मित्र, परिवार, विद्यार्थी, महापालिकेचे माजी महापौर श्री. सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली नागरी सत्काराचा बेत रचलेला होता. अध्यक्ष म्हणून ग. प्र. प्रधान हे आपले ऐंशी वर्षांचे वय विसरून सहभागी झालेले होते. तसेच डॉ. विश्वनाथ शिंदे, गो. मा. पवार, प्रा. वैजनाथ महाजन इत्यादी प्राध्यापक वर्ग, त्याचबरोबर त्यांचे माजी विद्यार्थीही या कार्यक्रमास हजर होते. या कार्यक्रमाच्या उत्तरादाखल म.द. हातकणंगलेकरांनी भाषण केले होते. या कार्यक्रमानंतर त्यांच्या मनामध्ये विचार येतात. ''आता आपण या आयुष्यातून पार पडलो आता अज्ञानाच्या दरीत कसले लाल, केशरी दिवे' आहेत कुणास ठाऊक!''[१८] आजअखेर आपण जगलेल्या जीवनासोबत भविष्यामध्ये आपल्या वाट्याला जे जीवन येणार आहे त्याविषयीची हूरहूर त्यांच्या मनामध्ये असलेली जाणवते, ती नकळतपणे या लेखाच्या शेवटी व्यक्त होते.

याबरोबरच म. द. हातकणंगलेकर यांनी आपल्या जीवनातील कटू सत्यही सांगितले आहे.

म.द. हातकणंगलेकर आपल्या जीवनातील सर्व घटना अनेक व्यक्तिरेखांच्या माध्यमातून प्रांजळ व प्रामाणिकपणे वाचकासमोर उभे करतात. हा आपला पूर्वायुष्याचा पट वाचकांसमोर व्यक्त करताना ते कोठेही कचरले नाहीत. जे जीवन आपण भोगलो, अनुभवलो ते वास्तवतेच्या पातळीवर त्यांनी वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून प्रस्तुत केलेले दिसून येते. मग तो जीवनातला कोणताही प्रसंग असो, सिगारेट आणि दारू यांचे व्यसन आपणास व्यक्तिंच्या सहवासातून कसे जडले याविषयीही ते लिहितात. म.द. हातकणंगलेकर सुपरिटेंडेंट होते तेव्हा त्यांनी विद्यार्थ्यांच्या सहवासातील काही अनुभव सांगितले आहेत. त्यामधील एका आठवणीमध्ये ते लिहितात, एक श्रीमंत घरातील मुलगा माझ्या खोलीत आला आणि म्हणाला, ''सर, माफ करा पण तुम्ही आमच्यापेक्षा मोठे असून अजूनही साधी सिगरेट ओढत नाही हे आम्हाला बरे वाटत नाही. आम्ही गुन्हा करतो असे वाटते. पण हा डबा मी आणला आहे. तो फळीवर ठेवून जातो.'' [१९] असे म्हणून ५५५ चा टिन वरच्या फळीवर ठेवून तो निघून जातो. तो विद्यार्थी गेल्यानंतर लेखक त्यातील एक सिगारेट ओढून पाहातात. त्याची चव त्यांना आवडते. पुढे एम. ए. च्या अभ्यासासाठी खोली घेतली होती. दूध घालण्यासाठी येणाऱ्या मुलाजवळ दूध व सिगारेट या दोन्हीचेही रतीब त्यांनी सुरू केली. या सिगारेटचे व्यसन म.द. हातकणंगलेकरांना इतके जडले की त्याविषयीचा एक प्रसंग ते सांगतात. त्यांचे एक स्नेही डॉक्टर त्यांना खिजवण्यासाठी घरी आले आणि म्हणाले, ''तुम्हाला प्रिय असणारी एक भेट आणली आहे ! मी शरमिंधा होऊन नको म्हणेन असे त्यांना वाटले असावे; पण मी थँक्स म्हणून ती ठेवून घेतली.'' [२०] मात्र त्याचा परिणाम हृदयविकारात झाला. पुढे डॉक्टरांनी विश्रांतीसाठी सहा महिने झोपवून ठेवले. त्यामुळे सिगारेटचे व्यसन आपसुकच सुटले गेले असे म.द.हातकणंगलेकर सांगतात.

मद्याची सुरूवातही अशीच अपघाताने आणि एका पवित्र प्रसंगाने जडलेली होती. लेखकांचे नुकतेच लग्न झाले होते. त्यावेळी ते धारवाडला राहायला होते. तेथे 'जयवंतराव' हे अफलातून व्यक्तिमत्व असणारे निकटचे नातलग राहात होते. त्यांच्या घरी सत्यनारायणाची पुजा होती. पुजेला थोडा अवधी होता. पर्यायाने जेवणालाही अवकाश होता. तो पर्यंत ड्रिंक घेऊ.,

असे ते म्हणाले. तेव्हा लेखकांनी आपण ड्रिंक घेत नसल्याचे सांगितले. जयवंतरावांनी आजच्या शुभमुहूर्तावर सुरू करा, अशी सुचना केली. अशा तऱ्हेने व्यसनाला सुरूवात झाली.

जीवनातील अशा नानाविध व्यक्तिंच्या आठवणी व प्रसंग त्यांनी प्रांजळपणे मांडले आहेत. त्या मांडत असताना त्यांनी कुठेही आडपडदा ठेवलेला नाही. मनामध्ये असणारी आतली आणि बाहेरची अशी दोन्हीही कवाडे त्यांनी खुली केली आहेत. अशी कवाडे खुली करताना त्यांना 'स्व' च्या कोणत्याही खोट्या प्रतिष्ठेची आवश्यकता कधिच वाटलेली नाही.

## ३.३ निष्कर्ष

अशा व्यक्तिचरित्रपर आठवणी संग्रहाला जे मूल्य लाभलेले आहे. त्याचे सर्वस्वी श्रेय म. द. हातकणंगलेकरांनाच द्यावे लागेल. या सर्वच व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या बालपणापासून ते पंचाहत्तरीपर्यंतचे वाट्याला आलेले अवघे जीवन प्रत्ययकारी रीतीने कथन केलेले आहे. या ग्रंथाच्या वाचनावरून 'उघडझाप' हा म.द. हातकणंगलेकरांच्या जीवनाची गाथा कथन करणारा आत्मपर आठवणींचा ग्रंथ आहे, असे तर वाटतेच, पण या ग्रंथाचे मूल्य एवढ्यावरच सीमित न राहता कथा, कादंबरी या वाङ्मय प्रकारासारखे एक सर्जनशील साहित्य वाचल्याचाही आनंद वाचकास मनमुरादपणे मिळून जातो. एकंदरीत 'उघडझाप'चे मूल्य सांगताना प्रा. गो. मा. पवार सांगतात, " या साऱ्या गुणवत्तेच्या मूर्धन्यस्थानी असणारा त्यांचा वृत्तिविशेष म्हणजे त्यांच्या ठायी असणारा समंजसपणा, प्रगल्भता आणि माणसाकडे क्षमाशीलपणे, प्रेमपूर्वक रीतीने पाहण्याची दृष्टी. समजून घेणे म्हणजे क्षमाशील होणे, प्रेमगर्भ होणे To understand all is to pardon all. गुणवत्तेच्या समृद्धीमुळे त्यांचा 'उघडझाप' हा ग्रंथ मूल्यवान बनलेला आहे."[२१]

म. द. हातकणंगलेकर हे अबोल मनाचे, मितभाषी स्वभावाचे असे वरवर पाहाता त्यांचे व्यक्तिमत्व दिसत असले तरीही त्याचे अवघे जीवनच आपल्या स्नेही-सोबत्यांच्या सहवासात खर्ची पडले. आपले मित्र, स्नेही, कुटुंबीय इत्यादी कटू-गोड स्मृतीत ते नेहमीच रममाण होत राहीले. त्याबरोबर जीवनामध्ये दुःखद प्रसंग निर्माण झाले की त्यांच्या मनावर खोल व्रण उमटत असे, त्यामुळे ते कासाविस होत असत. आपल्या सोबत्यांच्या, त्यांच्यातील 'मी' भोवती फिरणाऱ्या अनेक 'मी' च्या सोबत्यांच्या आठवणींचे जिवंत चित्रबद्ध आरेखन करून

हातकणंगलेकरांनी मित्रऋण, पितृऋण आणि अनेकांची अनेक देणी फेडण्याचा प्रयत्न 'उघडझाप' या ग्रंथाच्या माध्यमातून केलेला आहे. यामध्ये त्यांच्या शोधक मर्मग्राही दृष्टिच्या समीक्षकाचेही अंतरंग उलघडत जाते. हे या ग्रंथाचे मूल्य आहे, असे म्हणावेसे वाटते.

या पुढील प्रकरणात म. द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या ग्रंथाची निवेदन पद्धती, भाषाशैली, अलंकार, विनोद, वाक्प्रचार व्यक्तिचित्रण, प्रसंगचित्रण इत्यादी घटकांचा अभ्यास करून लेखकाच्या लेखनाची वैशिष्ट्ये अभ्यासावयाची आहेत.

★★★★★

## प्रकरण तिसरे

# संदर्भ


१) हातकणंगलेकर म. द. : 'उघडझाप', मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, प्रथमावृत्ती, १ फेब्रुवारी २००५, पृष्ठ क्र. २

२) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ३

३) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ३

४) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १३

५) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ३७

६) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ४७

७) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ४६

८) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ५८

९) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ७१

१०) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ७९

११) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ८१

१२) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १०८

१३) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १०९

१४) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ११४

१५) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १५४

१६) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १०४

१७) 'उघडझाप' : पृष्ठ क्र.७६

१८) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १९२

१९) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १७६

२०) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १७६

२१) प्रा. पवार गो. मा. : 'ललित', म. द. हातकणंगलेकर विशेषांक जानेवारी २००८, पृष्ठ क्र ३२


*********